अमरावती महानगरपालिका, अमरावती
बाजार व परवाना विभाग
अल्प मुदतीची निविदा

अमरावती महानगरपालिकातर्फे दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ ते २१ ऑक्टोबर, २०२५ दरम्यान सांस्कृतिक भवन येथे दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाचे स्टॉल करीता अल्प मुदतिची निविदा मागविण्यात येते आहे. याकरीता इच्छुक व्यवसायीका कडुन जास्तीत जास्त दराचे ऑफर मुल्याचे निविदा मागविण्यात येत आहे.या संबंधित अटी व शर्ती बाजार व परवाना विभाग राजापेठ झोन क्र.२ अमरावती येथे बाजार व परवाना विभाग पहिला माळा वरील कार्यालयात पाहावयास मिळतील किंवा मनपा चे संकेल स्थळावर Website - amravaticorporation.in वर माहिती उपलब्ध राहतील.

सविस्तर माहितीसह विहित नमुन्यातील निविदा प्रपत्र तसेच अटी व शर्ती रु ५०० /- +१८ % G.S.T रोखीने भरुन दि.१४.१०.२०२५ ते १६.१०.२०२५ पर्यत दु २.०० वाजता पर्यत प्राप्त करता येईल . सिलबंद लिफाफा दि. १६.१०.२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यत बाजार व परवाना विभाग कार्यालयात दाखल करता येईल.तसेच सदर लिफाफा दि.१६.१०.२०२५ दुपारी ५.०० वाजता मा उपायुक्त ( प्रशा) यांचे कार्यालयात उपस्थितांन समोर उघडण्यात येतील.

14.10.25
सहा आयुक्त
बाजार व परवाना विभाग
महानगरपालिका अमरावती

उपायुक्त (प्र)
महानगरपालिका अमरावती

Scanned with OKEN Scanner

**अमरावती महानगरपालिका,अमरावती**
बाजार व परवाना विभाग
अल्प मुदतीची निविदा

अमरावती महानगरपालिकातर्फे दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ ते २१ ऑक्टोबर, २०२५ दरम्यान सांस्कृतिक भवन येथे दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. सदर ठिकाणी स्टॉल वितरीत करीता बंद लिफाफा मार्फत दर मागविण्याबाबत सुचना. अटी व शर्ती खालील प्रमाणे

१) कोटेशन फॉर्मची किमंत रुपये ५००/- + १८% टक्के जि.एस.टी राहील.

२) कोटेशन फॉर्म बाजार व परवाना विभागात राजापेठ झोन क्र.२ मनपा हॉटेल ग्रेस इन मांगे अमरावती येथे दि.१४/१०/२०२५ ते दि. १६/१०/२०२५ रोजी पर्यंत दुपारी ०२:०० वाजे पर्यंत प्राप्त करण्यात यावे.

३) सिलबंद कोटेशन फॉर्म बाजार व परवाना विभागात दि.१६/१०/२०२५ रोजी दुपारी ०४:०० वाजे पर्यंत दाखल करण्यात यावे.

४) दिनांक १६/१०/२०२ रोजी साय ५.०० वाजता कोटेशन फॉर्म मा.उप आयुक्त (प्रशा.) यांचे कार्यालयात उपस्थितांसमोर उघडल्या जातील.

५.) आरक्षीत स्टॉल करीता निविदे चा विचार करण्यात येणार नाही

६) स्टॉल मागणी जास्त असल्याने एका अर्जदाराला एक प्लॉट वितरीत करण्यात येईल व सदर प्लॉट प्राप्त करीता निश्चित दरा पेक्षा जास्त दर कोटेशन फॉर्म मध्ये नमुद करावे सदर दर कमीत कमीत १००/- रुपये किंवा त्यापेक्षा जास्त वाढीव प्रमाणे वाढावे लागेल, कमी दराचे कोटेशन रद्द करण्यात येईल.

७) स्टॉल करिता महत्तम दर प्राप्त धारकांना स्टॉल मध्ये व्यवसाय करता येईल स्टॉल व्यतिरिक्त जागेचा वापर करता येणार नाही आढळल्यास अतिक्रमण विभागा मार्फत जब्तीची कार्यवाही करण्यात येईल

८) कोटेशन फॉर्म भरतांना स्टॉल क्रमांक, स्टॉल दर स्पष्ठ नमुद करावे व नमुद ऑफर मुल्य दर + १८ % जि.एस.टी त्याच दिवसी रोख किंवा डी.डी स्वरुपात भरणा करणे बंधनकारक राहील.निर्धारीत दिव्रसी रक्कम न-भरल्यास सदर स्टॉल गरजु अर्जदारांना वाटप करण्यात येईल.

९) कोटेशन फॉर्म भरतांना अर्जदाराने आधार कार्ड, पॅन कार्डची व जि.एस.टी प्रमाणपत्र असल्यास छायाप्रत व मोबाईल नंबर कोटेशन सोबत सलग्न करावे.

Scanned with OKEN Scanner

१०) सदर स्टॉल धारकांना कोणताही अवैद्य,मादक पदार्थ, विस्फोटक इत्यादी प्रकाराचे व्यवसाय करता येणार नाही. कायदा व सुव्यवस्थाचे दृष्टीने व्यवसाय करणे बंधनकारक राहील. याबाबतचे तक्रार प्राप्त झाल्यास कोणतीही नुकसान भरपाई नकरता त्वरीत स्टॉल रद्द करण्यात येईल.

११) स्टॉल धराकंना शासन तसेच महानगरपालिका मार्फत वेळोवेळी निर्गमीत केलेले नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. सदर स्टॉल समोर डस्टबीन ठेवणे बंधनकारक राहील. कोणताही प्रकाराचे कचरा रस्ता वर टाकु नये आढळुन आल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१२) खाध्य पदार्थ स्टॉल धारकांना अन्न व औषध विभागाचे प्रमाणपत्र तसेच सदर जागेत घरेलु सिलेंडरचा वापर करता येणार नाही.

१३) कोणताही अर्ज स्विकार करण्याचा किंवा नकार करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचा राहिल

१४) करता वरील नमुद कोणतीही अटीचा पालन न-केल्यास कोणतेही प्रकाराचे नुकसान भरपाई न सदर प्लॉट रद्द करण्यात येईल.

सहा आयुक्त
बाजार व परवाना विभाग
महानगरपालिका, अमरावती

अमरावती महानगरपालिका
AMC
अमरावती

उप आयुक्त (४.)
महानगरपालिका, अमरावती

Scanned with OKEN Scanner